The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत जनाबाई यांच्या अभंगातील विद्रोह

**डॉ. कालिदास गुडदे,**
**सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, माधवराव पाटील महाविद्यालय पालम**

वारकरी संप्रदायाची स्थापना तेरावा शतकात संत ज्ञानदेव आणि संत नामदेव यांनी केली. त्यापूर्वी महाराष्ट्रात महानुभव पंथ समाज प्रबोधनाचे काम करीत होता महानुभव पंथानी आपल्या विचारसरणीत स्त्री -पुरुष समानता ठेवून काम केले पण ते येथील ब्राह्मण्यवाद्यांना पचनी पडले नाही. त्या काळात महाराष्ट्रात प्रचंड मोठ्या प्रमाणात जातिवाद, वर्णवाद, वंशवाद वाढला होता. माणूस माणसाला किती कमी लेखत असल्यामुळे जातीवादाने सामान्य माणसाला जगणे मुश्किल करून ठेवले होते.

देवधर्माच्या नावाखाली सामान्य सूचित पिढीत माणसाचे जगणे असे झालेले होते. त्याचप्रमाणे स्त्रियांना सुधरे समजले जात असल्यामुळे तिचे क्षेत्रफळ आणि मूळ एवढ्या पुरतेच सीमित राहिले. त्यांना आणि सर्वसामान्य जनतेला समानतेचा व अध्यात्माचा संपूर्णपणे अधिकार नाकारलेला होता. याचा परिणाम मांग , महार ,ढोर, चांभार , न्हावी साळी ,धनगर असं कितीतरी खालच्या जातीचा उच्चवर्णीय लोकांनी अनन्वित छळ मांडला होता .अशा कठीण काळात संत ज्ञानेश्वर आणि संत नामदेव यांनी सामान्य स्त्री-पुरुषांना भक्तीच्या प्रांतात जात पात अडसर न ठरता भक्तीसाठी फक्त चित्तशुद्धी महत्त्वाची असते त्याला विठ्ठलाची भक्ती करता येते अशी प्रेरणा पेरली .

अठरापगड जातीमध्ये विठ्ठल भक्तीचा समतावादी विचार त्यांनी मांडला आणि कर्मकांडाची कोंडी फोडलीचा समतावादी विचार त्यांनी मांडला .भक्ती करण्यासाठी सोहळ्या ओवळे लागत नाही हा साधा सोपा विचार त्यांनी तत्कालीन समाजाला दिला . त्यामुळे सर्व समाजातील स्त्री-पुरुष वारकरी संप्रदायात येऊन विठ्ठलाची उपासना करू लागले . त्यात संत गोरा कुंभार, संत सावता माळी, संत चोखोबा , संत बंका महार ,संत कर्ममेळा , संत नामदेव ,संत सोयराबाई ,संत कान्होपात्रा ,संत जनाबाई ,संत सखुबाई ,संत रोहिदास ,संत कुर्मदास असे कितीतरी विविध जाती धर्मातील संत चंद्रभागेच्या वाळवंटात भगवा पताका घेऊन विठ्ठल नामाच्या गजरात न्हाहून निघाले . भक्तीचा आनंद घेऊ लागले व पुरुषाच्या बरोबरीने महिला संत सुद्धा आपल्या आध्यात्मिक विचाराला प्रकट करू लागल्या .

" देव भक्तीचा भुकेला।
यातीं कुळ नाही त्याला ॥ "

हा संत नामदेवांनी जनसामान्य शूद्र समजल्या जाणाऱ्या लोकांना समतेचा मंत्र दिल्यामुळे विविध जाती धर्मातील संत कवी आणि कवयित्री आपल्या मनातील अध्यात्मिक भाव आणि विचार अभंगाच्या माध्यमातून प्रकट करू लागल्या . त्यात नाम्याची दासी म्हणून जिने स्वतःला गौरविले अशा संत जनाबाईंनी आपल्या अभंगाच्या माध्यमातून तत्कालीन समाजाच्या विरोधात विद्रोह केला ती आपल्या अभंगात म्हणते –

" डोईचा पदर आला खांद्यावरी ।
भरल्या बाजारी जाईन मी ।
हाती घेईल टाळ खांद्यावरी विणा ।
आता मज मना कोण करी ॥
पंढरीच्या पेठे मांडीयेला पाल ।
मनगटावर तेल घाला तुम्ही ।
जनी म्हणे देवा झाले मी वेसवा ।
रिघाले केशवा घर तुझे ॥

अशा पद्धतीने संत जनाबाई आपल्या अभंगातून तत्कालीन समाजात जो अन्याय व स्त्रियांची छळवणूक केली होती त्या विरोधात बंड पुकारले होते . या संत जनाबाईच्या बंडाला संत नामदेवांनी ताकद दिली आणि जनी बोलू लागली .मी आता कुणाच्याही बंधनात राहणार नाही मी माझ्या डोईवर पदर घेणार नाही असा स्त्रीवादी विचारतील बाराव्या शतकात मांडते . भरल्या बाजारात जाण्यासाठी आता मी कुणाच्याही परवानगीची वाट पाहणार नाही मी विठ्ठलाचे घर निघाले आहे असा विद्रोही विचार ती आपल्या अभंगातून प्रकट करून शूद्र समाजातील स्त्री-पुरुषांना प्रेरणा देते . विठ्ठलाची भक्ती करण्यासाठी जात-पात आणि स्त्री-पुरुष हा भेदभाव अमंगळ आहे . असे ती आपल्या अभंगातून स्पष्टपणे बोलते .

या संत जनाबाईच्या विचारामुळे तिला उच्चवर्णीय भडव्यांनी खूप त्रास दिला पण ती डगमगली नाही .तिने पांडुरंगाची भक्ती स्वीकारली होती पांडुरंग तिला प्रत्यक्ष भेटून तिच्या दैनंदिन जीवनातील कामकाजामध्ये मदत करत होता . हा संत जनाबाईच्या आपल्या अभंगातील अनुभव ईश्वराला शारीर पातळीवर आणून उच्च आणि पराकोटीच्या भक्तीचे रूप म्हणून या अभंगांकडे आपल्याला पाहता येते हाही एका खऱ्या अर्थाने विद्रोहच आहे .संपूर्ण सृष्टी परमेश्वरने निर्माण केल्यामुळे या सृष्टीत कुठल्याही प्रकारचा भेदभाव असता कामा नये कुठल्याही पद्धतीची उच्चनिष्ठ असता कामा नये असा संत जनाबाईचा अध्यात्मातला विचार होता .कुठल्याही पद्धतीच्या कर्मकांडाला आपल्या भक्तीमध्ये त्यांनी स्थान दिले नाही . आणि त्यांनी भक्तीच्या मार्गात येणाऱ्या कोणाचीही भिडभाड ठेवली नाही .हे त्यांच्या अभंगाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे .

संत जनाबाई स्त्री असल्या तरी सर्वप्रथम मानवतावादी विचार आणि स्त्रीवादी विचार आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्या अत्यंत स्पष्टपणे मांडतात . स्त्री आणि पुरुष यांच्यात भेदभाव करणाऱ्या लोकांना त्या स्पष्टपणे सांगतात की स्त्रियांची सहनशक्ती ही पुरुषांपेक्षा उच्च दर्जाची असते . एकूण मानवी जीवनामध्ये स्त्रियांचे स्थान वरच्या दर्जाचे असते म्हणून त्या आपल्या अभंगात म्हणतात .–

"स्त्री जन्म मिळाला म्हणून न व्हावे उदास
साधुसंत मज केले ऐसे ॥
संताच्या घरची दासी मी ऐकली ।
विठोबाने दिली प्रेम कळा ॥

विदुर सात्विक माझी या कुळीचा ।
तयाचा अंगीकार केला देवा ॥
न उच्चरिता कुळ गणिका उद्धरली ।
तैसे नामे केले देवा ॥ "

दासी पुत्र विदुर असून परमात्मा त्याच्या घरी भोजन घेतो . मग मला तो का भेटणार नाही? असा प्रश्न त्या करून ईश्वर भेटण्यासाठी अंतकरणात प्रेम असावे लागते, चित्ताची शुद्धता असावी लागते .उच्च कुळात जन्म झाल्यामुळे परमेश्वराची प्राप्ती होते असे म्हणणे धादांत कोठे आहे .कारण कुठल्या कुळात जन्म घ्यावा हे व्यक्तीच्या हातात नसते . पण चांगले कर्म आणि भक्ती करून पांडुरंगाला प्रसन्न करून घेता येते . हा विचार संत जनाबाईंनी सर्व स्त्री आणि पुरुषांमध्ये रुजवला . म्हणजेच एक प्रकारे स्त्रीमुक्तीचा लढा अध्यात्माच्या पातळीवर सर्वप्रथम संत जनाबाईंनी 700 वर्षांपूर्वी उभा केला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही .संत जनाबाईचे बंड म्हणजे सबंध स्त्री जातीचा अहंकार आहे . पुरुषप्रधान संस्कृतीने स्त्रियांना घातलेल्या बेड्या तोडून तिने मुक्त श्वास घेण्याचा प्रयत्न केलेला आहे .म्हणून संत जनाबाईंना वारकरी संप्रदायातील जाईची वेल असे म्हणतात .

पांडुरंगाची भक्ती करण्यासाठी कुठल्या मध्यस्ताची गरज नाही म्हणून तिने वेगवेगळे दाखले दिले आहेत .सातत्याने आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी समाजमन बदलण्याचा प्रयत्न केलेला असून एवढेच नाही तर ती साक्षात ईश्वराला म्हणजेच पंढरपूरच्या विठ्ठलाला शिव्या देताना सुद्धा घाबरत नाही .

" अरे विटा अरे विट्या ।मूळ मायेच्या कारट्या ।
तुझे गेले मढे । तुला पाहून काळ रडे ॥ "

यातून संत जनाबाईंच्या मनातील खंत व्यक्त होते . त्यांच्या या शिव्या आणि रागांमध्ये त्यांच्या अंतकरणातील भक्ती स्पष्ट दिसते . उच्चवर्णीय भडव्यांनी स्त्री आणि सुद्रांवर जो अन्याय पंढरपुरात केला आहे त्याचा निषेध त्या करतात .त्यांच्यावर पंढरपूरच्या भडव्यांनी घेतलेल्या चोरीच्या आरोपावर त्या विठ्ठलाची भांडतात . एकूणच त्यांच्या विद्रोहात आणि बंडा मध्ये सत्याचा पुरस्काराची वृत्ती दिसून येते . त्यातूनच त्यांच्या शब्दांमध्ये विठ्ठल आला शिव्या देण्याची सुद्धा ताकद आहे . म्हणून संत साहित्यात संत जनाबाईचे साहित्य व त्यांचे लौकिक कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे .

**संदर्भ सूची :**

१ . सरदार गं .बा . ,संत साहित्याची सामाजिक फलश्रुती
२ . पाटणे यशवंत डॉ . , जगाच्या कल्याणा